22 SEP 2026

जनप्रवास

# ऑस्ट्रेलियन विद्यापीठाच्या कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट



शिवाजी विद्यापीठाची पाहणी करताना दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील कॅम्पसचे कुलगुरू डॉ. अमित चाकमा, डॉ. केलिथा चेरियन. सोबत कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

**जनप्रवास : कोल्हापूर**

द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील शाखेने, म्हणजेच यू.डब्ल्यू.ए. येथील कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली. विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन तसेच नव्या ज्ञानक्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यता चर्चेत आल्या.

दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला कॅम्पस सुरू केला असून त्या कॅम्पसचे डॉ. चाकमा हे कुलगुरु आहेत. त्यांच्यासह विद्यापीठाच्या अकादमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही शिवाजी विद्यापीठास सकाळी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. कुलगुरू डॉ. चाकमा यांनी सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य

## ● शैक्षणिक व संशोधकीय सहकार्याबाबत सकारात्मक

अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन सुविधा, क्रीडा सुविधा यासह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन इत्यादी पाहून समाधान व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठासमवेत निश्चितपणाने शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी या प्रसंगी दिली.

डॉ. राजनीश कामत म्हणाले, या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रातील उपक्रम यासाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी व संशोधकांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या भेटीप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे हेही उपस्थित होते.

## युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविषयी थोडक्यात...

द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया हे जगातील आघाडीच्या शंभर विद्यापीठांपैकी एक असून क्यूएस-२०२६ क्रमवारीत ७७ व्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित 'ग्रुप ऑफ एट' संशोधन विद्यापीठांपैकी ते एक आहे. भारतात कॅम्पस सुरू करणारे ते पहिले 'Go8' विद्यापीठ आहे. त्यांचे १३ विषय जगातील अव्वल ५० मध्ये गणले जातात.

यूडब्ल्यूए-इंडियाचे कॅम्पस अंधेरी (मुंबई) आणि चेन्नई येथे आहेत. मुंबई कॅम्पससाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मंजुरीचे पत्र मिळाले असून चेन्नई कॅम्पसच्या मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. यूडब्ल्यूए-इंडियाकडून कॉम्प्युटर सायन्स, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, बिझनेस मॅनेजमेंट, ग्लोबल बिझनेस, एंटरप्राइज अँड इनोव्हेशन हे पदवी अभ्यासक्रम, तसेच एमबीए आणि मास्टर ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हे पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जात आहेत.

2 2 SEP 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑस्ट्रेलियन विद्यापीठाच्या कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट

## शैक्षणिक व संशोधकीय सहकार्याबाबत सकारात्मक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियातील द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील शाखेने, म्हणजेच यूडब्ल्यूए (इंडिया) येथील कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी सोमवारी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन तसेच नव्या ज्ञानक्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यता यावेळी चर्चेत आल्या.

दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला



### युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविषयी थोडक्यात...

द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया हे जगातील आघाडीच्या शंभर विद्यापीठांपैकी एक असून, क्यूएस-२०२६ क्रमवारीत ७७ व्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित 'ग्रुप ऑफ एट' संशोधन विद्यापीठांपैकी ते एक आहे. भारतात कॅम्पस सुरु करणारे ते पहिले 'जी ८' विद्यापीठ आहे.

कॅम्पस सुरू केला असून, त्या कॅम्पसचे डॉ. चाकमा हे कुलगुरू आहेत. त्यांच्यासह विद्यापीठाच्या अकादमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही शिवाजी विद्यापीठास सकाळी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले.

कुलगुरू डॉ. चाकमा यांनी सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यांनी शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन सुविधा, क्रीडा सुविधा यासह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन इत्यादी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. नजीकच्या कालखंडात शिवाजी विद्यापीठासमवेत निश्चितपणाने शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रांतील उपक्रम यासाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील. या भेटीप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे हेही उपस्थित होते..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 SEP 2026
लोकमत

# ऑस्ट्रेलियन विद्यापीठाच्या कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट



युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारत कॅम्पसचे कुलगुरू डॉ. अमित चाकमा, डॉ. केलिथा चेरियन यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी कुलगुरू रजनीश कामत आदी उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ऑस्ट्रेलियातील द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील शाखेने, म्हणजेच यू.डब्ल्यू.ए. (इंडिया) येथील कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी सोमवारी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. यादरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली.

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला कॅम्पस सुरू केला असून त्या कॅम्पसचे डॉ. चाकमा हे कुलगुरू आहेत. त्यांच्यासह धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. चाकमा यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन सुविधा, क्रीडा सुविधा यांसह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन इत्यादी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रांतील उपक्रम यांसाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील.

2 2 SEP 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑस्ट्रेलियन विद्यापीठ कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट

• शैक्षणिक, संशोधन सहकार्याबाबत सकारात्मक चर्चा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ऑस्ट्रेलियातील द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील शाखेचे कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी सोमवारी शिवाजी विद्यापीठाला भेट देत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील सहकार्याबाबत सकारात्मक चर्चा केली. विद्यार्थी, प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन तसेच नव्या ज्ञानक्षेत्रांमध्ये सहकार्याच्या विविध बाबींवर चर्चा झाली.

प्रा. चाकमा यांच्यासमवेत विद्यापीठाच्या अकादमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. आर. के. कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. प्रा. चाकमा यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले.

डॉ. चाकमा यांनी शिवाजी विद्यापीठासोबत लवकरच शैक्षणिक व संशोधकीय संबंध दृढ करण्याची ग्वाही दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. अमित चाकमा, डॉ. केलिथा चेरियन यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.** **(छाया : नाज ट्रेनर)**

22 SEP 2026
सकाळ

# ऑस्ट्रेलियन कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट

कोल्हापूर, ता. २१ : ऑस्ट्रेलियातील दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील शाखेतील कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी शिवाजी विद्यापीठास आज भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. विद्यार्थी व प्राध्यापक देवाण-घेवाण, संयुक्त संशोधन व नव्या ज्ञानक्षेत्रांत सहकार्याच्या शक्यतांची चर्चा झाली.

दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला कॅम्पस सुरू केला आहे. या कॅम्पसचे डॉ. चाकमा कुलगुरू आहेत. त्यांच्यासह विद्यापीठाच्या अकॅडमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही विद्यापीठास भेट दिली. कुलगुरू डॉ. आर. के. कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले.

चाकमा यांनी विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन व क्रीडा सुविधा यासह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन पाहून समाधान व्यक्त केले. येत्या काळात विद्यापीठासमवेत निश्चितपणाने शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कामत यांनी या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाण-घेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम व कृत्रिम बुद्धिमता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रांतील उपक्रम यासाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

2 2 SEP 2026

सकाळ



कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. व्यासपीठावर मान्यवर.

# 'कॉमर्स'मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** 'नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रायोजकत्वाखाली कॉमर्स कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे नवीन शिक्षण धोरण २०२० अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा झाली. यावेळी त्या बोलत होत्या कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम अध्यक्षस्थानी होते. डॉ. जाधव म्हणाल्या, 'नवीन शिक्षण धोरण लवचिक असून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात ज्ञान व कौशल्य संपादन करण्याची संधी देते. पदवी शिक्षणासोबत रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्यावर या धोरणात भर दिला आहे.' विविध महाविद्यालयांमधून १३० हून अधिक शिक्षक प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. बी. राजमाने यांनी परिचय करून दिला. डॉ. आर. जे. बिरजे, डॉ. सुरेखा सांगरूळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. के. जी. कांबळे यांनी आभार मानले.

22 SEP 2026

सकाळ




कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्ष उद्‍घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. प्रतिमा पवार.

# 'महावीर'मध्ये महिला विकास कक्षाचे उद्‍घाटन

**कोल्हापूर :** 'महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला विकास कक्षाची आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी केले. महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्षाचे उद्‍घाटन झाले. यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी अध्यक्षस्थानी होते. श्रावणमास ऋतु हिरवा अनुषंगाने प्रांगणात विविध उपक्रम झाले. वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्रीसाठी स्टॉल्स उपलब्ध करून दिले. यात कलाकुसरीच्या वस्तू, पिशव्या, पर्स, आर्टिफिशली ज्वेलरी, इंस्टंट पीठे, सजावटीच्या वस्तू, खाद्यपदार्थांचा समावेश होता. विद्यार्थीनीमधून उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व असलेली विद्यार्थिनी राजनंदिनी पडवळ हिची 'श्रावण क्वीन' म्हणून निवड झाली. प्रा. डॉ . कल्पना गंगातीरकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संध्या जाधव यांनी परिचय करुन दिला. डॉ. माधुरी रसाळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अश्विनी कोटणीस यांनी आभार मानले.

Marketmedia.

22 SEP 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# ऑस्ट्रेलियन विद्यापीठाच्या कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट



कोल्हापूर :

ऑस्ट्रेलियातील द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या भारतातील शाखेने, म्हणजेच यू.डब्ल्यू.ए. (इंडिया) येथील कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी सोमवारी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली. विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन तसेच नव्या ज्ञानक्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यता यावेळी चर्चेत आल्या.

दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला कॅम्पस सुरू केला असून त्या कॅम्पसचे डॉ. चाकमा हे कुलगुरू आहेत. त्यांच्यासह विद्यापीठाच्या अकादमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही शिवाजी विद्यापीठास सोमवारी सकाळी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. कुलगुरू डॉ. चाकमा यांनी सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यांनी शिवाजी विद्यापीठातील विविध सुविधा पाहण्यात मोठा रस दाखविला. विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन सुविधा, क्रीडा सुविधा यांसह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन इत्यादी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. नजीकच्या कालखंडात शिवाजी विद्यापीठासमवेत निश्चितपणाने शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

कुलगुरू डॉ. कामत यांनीही त्यांच्या भेटीविषयी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रांतील उपक्रम यांसाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी व संशोधकांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या भेटीप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे हेही उपस्थित होते.